# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ २२१४ /२०२४ दि. ०६ /१२/२०२४

## परिपत्रक

विषय:- ई-समर्थ प्रणालीव्दारे Affiliation Module मध्ये तातडीने माहिती भरणेबाबत.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, मा. प्र-कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये ई-समर्थ प्रणालीव्दारे Affiliation Module संदर्भात प्रक्रिया राबविण्याकरीता महाविद्यालयांकडून College Profile पुर्ण करुन घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही घेतली जात आहे, परंतु, बऱ्याच महाविद्यालयांनी आजतागायत College Profile भरुन सबमिट केलेले नाही. अशा महाविद्यालयांनी दिनांक ०९/१२/२०२४ रोजी पर्यंत College Profile भरुन सबमिट करावे.

१. ज्या महाविद्यालयांचे College Profile सबमिट झालेले आहे, परंतु College Profile ची माहिती पुर्णपणे भरलेली नाही, अशा महाविद्यालयांना फेर सादर करण्यासाठी अनुमती महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग Admin च्या माध्यमातून देण्यात आलेली आहे. त्या महाविद्यालयांनी दि. ०९/१२/२०२४ रोजी पर्यंत सादर करावे.

२. Affiliation प्रक्रिया करण्याकरीता सर्व प्रथम महाविद्यालयांकडून College Profile ची माहिती भरण्याची कार्यवाही घेतली जात आहे, परंतु सदर College Profile ची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, बऱ्याच महाविद्यालयांनी गोंडवाना विद्यापीठाव्यतिरिक्त संलग्नित असलेले विद्यापीठाची माहिती ज्यामध्ये चालु असलेले प्रोग्राम व शिक्षक यांची माहिती देणे अपेक्षित होते. परंतु संलग्नीत महाविद्यालयांनी College Profile मध्ये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित प्रोग्रामची माहिती भरलेली आहे. सदर बाबत नोंद घेवून दुरुस्ती करीता दिनांक ०९/१२/२०२४ रोजी पर्यंत महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाच्या ईमेल आयडीवर किंवा कार्यालयीन Whatsapp ग्रुपवर कळवावे.

करीता सर्व संलग्नित महाविद्यालयांनी वरील बाबींची नोंद घेवून तात्काळ College Profile भरुन सबमिट करावे. जेणेकरुन पुढील कार्यवाही घेणे सोईचे होईल.

मा. प्र-कुलगुरू यांच्या मान्यतेने,

( रविंद्र पी. जुनघरी )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी :-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली